## संपादकीय

"भारतातील सामाजिक आणि राजकीय चळवळी - विसावे शतक" या विषयावरील शोधनिबंध "नवज्योत" या रिसर्च जर्नल मध्ये प्रकाशित होत आहेत. ही बाब अत्यंत आनंदाची आहे. विविध चळवळींनी विसाव्या शतकातील भारताची जडणघडण केली. दैदिप्यमान अशा स्वातंत्र्य चळवळीमुळे याच काळात भारताची पारतंत्र्याकडून स्वातंत्र्याकडे वाटचाल झाली. याच शतकात भारत स्वतंत्र - सार्वभौम राष्ट्र म्हणून अस्तित्वात आले. अर्थात यामागे हजारो जणांनी दिलेले योगदान होते.

स्वातंत्र्यलढ्यात अनेकांनी आपले जीवन समर्पित केले. या काळातील स्वतंत्र भारताची सामाजिक जडणघडणही खूप महत्त्वाची ठरली. संविधानाने नागरिकांना अनेक हक्क अधिकार मिळवून दिले, मात्र प्रत्यक्षात सामाजिक, राजकीय, आर्थिक विषमता खूप मोठ्या प्रमाणावर होती. उच्चवर्णीयांची मानसिकता बदलणे आणि परंपरेने चालत आलेल्या कुप्रथा बदलणे हे खूप मोठे आव्हान होते आणि यासाठीच समाज सुधारकांना अनेक चळवळी उभा कराव्या लागल्या. यात कामगार चळवळी, शेतकरी चळवळी, स्त्रियांच्या चळवळी इ.चा समावेश करावा लागतो. या चळवळींचे स्वरूप, चळवळीचे नेतृत्व, चळवळींचे झालेले परिणाम या सर्वांचा अभ्यास आजही खूप आवश्यक आहे. सध्याच्या कालखंडातील अनेक सामाजिक - राजकीय - आर्थिक समस्यांचे उत्तर यातून मिळू शकते.

नवज्योतच्या या अंकात भारतातील सामाजिक राजकीय चळवळी- विसावे शतक, या मुख्य विषयावर आणि याच्याशी संबंधित उपविषयांवर आधारित 105 शोधनिबंध प्रसिद्ध होत आहेत. विविध विषयांचे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी यांनी आपले मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेतील शोधनिबंध या अंकासाठी पाठवले आहेत. या शोधनिबंधाच्या माध्यमातून भारतातील विविध सामाजिक, राजकीय चळवळीच्या विविध पैलूंची चर्चा केलेली आहे. या शोधनिबंधांचे स्वरूप पाहिले तर निश्चितच ज्या हेतूने हा विषय निवडला तो हेतू साध्य झाला असे म्हणावे लागेल.

धन्यवाद !